महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. १४४२(२(२)/२०१९/तेरा-अ दिनांक ३ ऑगस्ट, २०२१

**महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा- २०१९**
**पोलीस उपनिरीक्षक पदाचा सुधारीत निकाल**
**जाहिरात क्र. ०१/२०१९ व अधिसूचना क्र. ०८/२०१९**

# घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. २८ जुलै, २०१९ व दि. ४ ऑगस्ट, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा -२०१९ चा निकाल दि. ०२ मार्च, २०२० रोजी जाहीर करण्यात आला होता. दरम्यानच्या कालावधीत श्रीमती जयश्री लक्ष्मणराव पाटील यांनी मा. सर्वोच्च न्यायालयात सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या आरक्षणास आक्षेप घेऊन सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० दाखल केला. सदर न्यायिक प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ मे, २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार शासन सेवेतील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आले आहे. सदर न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०२०/प्र.क्र.३२०/१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२१ व बीसीसी-२०२१/प्र.क्र. ३६०/१६-ब, १५ जुलै, २०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाकडून कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरीता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरीत करुन विषयांकित परीक्षेचा सुधारीत निकाल दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहिर करण्यात आला आहे. सुधारीत निकालानुसार सदर मुख्य परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमाकांच्या याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

उपरोक्त निकालानुसार शारीरिक चाचणीस पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांना त्यांच्या परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्याच्या पृष्ठर्थ शारीरिक चाचणी व मुलाखतीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून शारीरिक चाचणीस बोलाविण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता शारीरिक चाचणीचे/मुलाखतीचेवेळी न केल्यास, अधिसूचनेतील तरतुदीनुसार दावे तपासतांना वा अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

प्रस्तुत निकालाआधारे शारीरिक चाचणी व मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या व अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ व दिनांक ११ मार्च, २०१९ रोजीच्या शुध्दिपत्रकातील तरतुदीनुसार तसेच दि. २४ ऑक्टोबर, २०१९ शुध्दीपत्रकानुसार विषयांकित अराजपत्रित गट-ब पदाकरिता त्यांचे क्रिडा विषयक प्रमाणपत्र वैध ठरते किंवा कसे याच्या पडताळणीकरिता सदर प्रमाणपत्र संबंधित विभागीय क्रिडा उपसंचालकांकडे पूर्व परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या दिनांक २९ जानेवारी, २०१९ या अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वी सादर केल्याची पोचपावती, उक्त दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे संबंधित क्रिडा प्रमाणपत्र व सदर क्रिडा विषयक प्रमाणपत्र गट-ब पदाकरिता वैध ठरत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रिडा उपसंचालकांचा क्रिडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल त्यांनी मुलाखतीच्या वेळेस सादर करणे अनिवार्य राहील.

प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

सदर लेखी परीक्षेच्या निकालानुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांचा शारिरिक चाचणीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या योग्य त्या वेळी प्रसिध्द करण्यात येईल. त्या कार्यक्रमानुसार उमेदवारांनी शारीरिक चाचणीकरीता दिलेल्या तारखेस वेळेवर स्वखर्चाने उपस्थित रहावे. शारिरिक चाचणीच्या सरावाच्या दृष्टीने ही बाब उमेदवारांना विदीत करण्यात येत आहे.

प्रस्तुत परीक्षेच्या सुधारीत निकालानुसार अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या गुणपत्रिकेतील गुणांची फेर पडताळणी करावयाची आहे. अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविण्यात आलेल्या दिनांकापासून १० दिवसाच्या आत आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. (आयोगाच्या संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्रमांक ६.४.४ कृपया पहावी.)

उप सचिव (परीक्षा-१)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.